सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद.

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
उस्मानपुरा, औरंगाबाद-431005
**website: www.gpabad.ac.in**
E-mail: principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in
office.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in

PURSUIT FOR EXCELLENCE

## अतिमहत्वाची सुचना

जा.क्र शातंनिऔ/विवि/२०२३/2081
दिनांक. 20 JUN 2023

**संदर्भः- महाराष्ट्र शासन इतर मागास बहुजन कल्याण विभाग शासन निर्णय क्रमांकःसंकीर्ण-२०२३/प्र.क्र.११/शिक्षण-१ दिनांक २४ मे २०२३**

संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना **सन २०१८-१९ ते २०२१-२२** या कालावधीत शिष्यवृत्ती/फ्रिशीप योजनेतील शिष्यवृत्ती अर्ज भरतांना आलेल्या अडचणीमुळे पोर्टलवर मुदतीत अर्ज भरता आले नाही किंवा अर्ज (Reject) झाला असेल **अशा विद्यार्थ्यांनी मा. प्राचार्य यांचे मार्फत ऑफलाईन अर्ज दिनांक.२३/०६/२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यत तात्काळ सादर करावेत ऑफलाईन अर्ज सादर करत असतांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन ऑफलाईन अर्ज करता येतील.**

१) ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीकरीता अर्ज करतांना आधार नोंदणी न केल्याने महाडीबीटी प्रणालीवर अर्ज नामंजूर (Auto Reject) झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना त्याच्या आधार प्रमाणपत्र सादर करून ऑफलाईन अर्ज सादर करावेत.

२) ज्या विद्यार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज सादर केला होता परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे महाडीबीटी प्रणालीवर सिस्टीम ॲडमीन कडुन अर्ज नामंजूर (Reject) झाले आहे अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर येईल, तथापी कोणत्या कारणामुळे ऑनलाईन अर्ज रिजेक्ट झाला त्याची कारणीमीमासा व त्याबाबतच्या पुर्ततेसह ऑफलाईन अर्ज सादर करावेत.

३) ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केला आहे व सद्याः स्थितीमध्ये निधी अभावी त्याच्या खात्यामध्ये शिष्यवृत्ती जमा झालेली नाही, अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर करता येणार नाही.

४) सदर ऑफलाईन अर्ज सादर करतांना महाडीबीटी प्रणालीवरील नामंजूर झालेल्या अर्जाचा क्रमांक Application Id नमुद करणे आवश्यक आहे. सदर Application Id नमुद नसेल अशा अर्जाचा शिष्यवृत्ती मंजूरीकरीता विचार केला जाणार नाही.

५) ज्या विद्यार्थ्याचे ऑनलाईन फॉर्म शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या निकषामध्ये बसत नसल्यामुळे (उदा उत्पन्न मर्यादा, नॉनक्रिमीलेअर, जातपडताळणी प्रमाणपत्र इ.) नामंजूर (Reject) झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन अर्ज सादर करता येणार नाही.

६) जे विद्यार्थी काही विशिष्ट कारणमूळे (महाविद्यालय बदल, शिक्षणात खंड इ.) महाडीबीटी प्रणालीवर अर्जाचा नोंदणी करू शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांना कारणमीमासासह ऑफलाईन अर्ज सादर करता येतील तथापी सदर प्रकरणी विद्यार्थ्यांना नमुद केलेली कारणमीमांसा समर्पक असल्यास शिष्यवृत्ती देय ठरणार आहे व याबाबतचा अंतिम निर्णय शासनाचा असणार आहे.

७) सदर ऑफलाईन अर्ज सादर करतांना महाडीबीटी प्रणालीवर लागू असलेले सर्व निकष संबधित विद्यार्थ्यांना लागू राहतील.त्याचप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे नोंदविणे आवश्यक राहील. (उदा. उत्पन्न मर्यादा नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र, जातपडताळणी प्रमाणपत्र,कॅप राउंड प्रमाणपत्र इ.)

८) त्या कोर्सचे मॅपिग शिष्यवृत्ती महाडिबीटी प्रणालीवर आहेत, अश्याच कोर्सचे शिष्यवृत्ती ऑफलाईन अर्जासाठी लागू राहील. महाडीबीटी प्रणालीवरील मॅपीग न झालेल्या कोर्सची ऑफलाईन पध्दतीने सादर झाल्यास अश्या अर्जाचा विचार केला जाणार नाहीत.

९) एकाच विद्यार्थ्याचे ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज सादर होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी तसेच याप्रकरणी ऑनलाईन अर्ज भरतांना स्वतःचे प्रतिज्ञापत्र संबंधित विद्यार्थ्याने द्यावे. सदर प्रकरणी दोन्ही प्रकारात विद्यार्थ्याने अर्ज सादर केलेला असल्याची बाब निष्पन्न झाल्यास संबंधितावर फौजदारी कारवाई करण्यात येईल.

१०) **सन २०१८-१९ पासुन सन २०२१-२२** या वर्षात ज्या विद्यार्थ्यांना महाडिबीटी प्रणालीवर फॉर्म भरण्यास अडचणी आल्यास अशा विद्यार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज सादर करून त्यांना शिष्यवृत्ती देण्यामागे केवळ होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवु नये असा मुख्य उद्देश आहे. **त्यामुळे उपरोक्तप्रमाणे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात संबंधित सहाय्यक आयुक्त/सहाय्यक संचालक याचेकडे शिष्यवृत्ती करीता ऑफलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी दिनांक २३.०६.२०२३ इतका असेल.**

११) **दिनांक.२३.०६.२०२३ नंतर येणाऱ्या कोणत्याही अर्जांना शासनाकडून मंजूरी देण्यात येणार नाही, यांची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

प्राचार्य
Principal
शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद
Government Polytechnic
Aurangabad

प्रत :-१. सर्व विभाग प्रमुख यांनी आपआपल्या विभागातील संबधित विदयार्थ्यांच्या निर्दशनास आणून द्यावे व योग्य त्या सुचना देण्यात याव्या.

२. मुलांचे व मुलींचे वसतिगृह सुचना फलकावर लावण्यासाठी